स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 26–12–2016** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| 2. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 3. | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| 4. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 5. | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 6. | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| 7. | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्य |
| 8. | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्य |
| 9. | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्य |
| 10. | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्या |
| 11. | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्या |
| 12. | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| 13. | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| 14. | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| 15. | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रामनाथ सोनवणे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 854:– {अग्निशमन विभाग} 32 मी. उंच हॅड्रॉलिक प्लेटफॉर्म खरेदी करणेबाबत अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागात 15 मी. उंचीचे सन 1999 निर्मितीचे 1 हॅड्रॉलिक प्लेटफॉर्म उपलब्ध आहे. सदर वाहन अग्निशमन सेवेमध्ये उंच इमारतीतील आगीच्या दुर्घटनेवर कार्य करण्यास फार उपयुक्त आहे. नागपूर शहरात अनेक उंच इमारती अस्तित्वात आले आहे. अशा इमारतींना विभागातर्फे अग्निसुरक्षा ना–हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येत असते विभागाकडे फक्त एकच 15 मीटर उंचीचे हॅड्रोलिक प्लेटफॉर्म आहे. परंतू यापेक्षा जास्त उंच इमारतींमध्ये एखादी दुघर्टना झाल्यास अग्निशमन विभागाकडे अशा उंच ठिकाणी समर्थपणे कार्य करण्यास 32 मी. उंचीचे हॅड्रॉलिक प्लेटफॉर्म असणे आवश्यक आहे.

सदर मशिन खरेदी कार्याकरीता प्रचलित बाजारभाव प्रमाणे रू. 686.37 लक्ष अपेक्षित खर्च राहणार आहे.

करीता उंच इमारतीतील अग्निशमन कार्याकरीता 32 मी. हॅड्रोलिक प्लेटफॉर्म खरेदी कार्याचे निविदा मागविण्याच्या विषयास स्थायी समितीने विचारात घेवून या विषयास मंजूर करून घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 855ः— {कारखाना विभाग} नागपूर महानगरपालिकेतील 29 नग निर्लेखित वाहने/मशिनरी, 06 नग फॉगींग मशिन व भंगार/निकामी टायर ई—निविदेअतंर्गत प्राप्त महत्तम दरानुसार सबंधीत निविदाकारास विक्री करण्याचा प्रस्ताव तसेच महत्तम दराचे संबंधित निविदाकार यांनी निविदा अटी—शर्ती नुसार भंगार वाहने/ साहित्याची उचल न केल्यास निर्लेखन मुल्या पेक्षा जास्त दर असणारे द्वितीय महत्तम दराचे निविदाकार यांना भंगार वाहने/मशिनरी, 06 नग फॉगींग मशिन व भंगार/निकामी टायर विक्री करण्याचा प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 856ः— {लोककर्म झोन 04} प्रभाग क्र. 51 अ + ब वसंत नगर व धंतोली येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पि. एम. ए. कंन्स्ट्रक्शन कंपनी हयांची मुळ प्राकलनीय दराची निविदा रूपये 29,98,151/—( रूपये एकोणत्तीस लक्ष अठयानऊ हजार एकशे ऐक्यावन रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्रमांक 682(Fix.Pro.) (A22001330803) अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 857ः— {लोककर्म झोन 05} प्रभाग क. 60.(अ) अंर्तगत सक्करदरा येथिल भांडे प्लाट व सुर्वे ले—आऊट येथिल रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचा कामास्तव प्राप्त निविदापैकि मे. फोनिक्स इजिनिअरिंग, यांची मुळ प्राकलनिय दराची निविदा रूपये **45,38,481/—** (पंचेचाळिस लक्ष अळतिस हजार चारशे ऐक्यांशी रूपये फक्त) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क. 681 (A22001330802) अंर्तगत प्रस्तावित आहे.

तरतुद मुक्त करण्याचा व मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 858ः— {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. 3 (ब) मधील मॉ. बम्लेश्वरी नगर, धम्मानंद नगर, येथे सिंमेट कॉक्रीट रस्त्यांचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. बिंद्रा कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 49,99,992/— पेक्षा 12.25 टक्के कमी दराची रू. 43,87,493/—(रूपये त्रैचाळीस लक्ष सत्यांशी हजार चारशे त्र्यॅानव) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्र. 679 (A42001470511) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 859ः— {अग्निशमन विभाग} नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशामक विभागाच्या आस्थपनेवर सरळसेवेने भरावयाच्या रिक्त असलेल्या पदांवर शासन निर्णय दि. 8 जानेवारी 2016 नुसार करार पद्धतीने सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचेमधुन चालक यंत्रचालक — 30 पदे व अग्निशामक विमोचन — 62 पदे भरण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 860ः— {झो. पु. प्रा.} नागपूर महानगरपालिका अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, तर्फे सेवादल नगर येथील झोपडपट्टीमध्ये बीएसयुपी

अंतर्गत घरकुल योजना राबविण्यात येत असून या अंतर्गत पायाभुत सुविधांचे कामाकरीता निविदा मागविल्या असता मे. अमृत कंस्ट्रक्शन यांची 27.00% जास्त दराची निविदेची वाटाघाटी नंतर 2.00% दर कमी करुन 25.00% अधिक दराची निविदा ही चालू दर सुची नुसार (सन 2016–17) 4.13% अधिक आहे. मंजूर करण्याचा तसेच या निविदेतील महानगरपालिकेचा हिस्सा रु. 20.54 लक्ष ची तरतूद पद क्र. A 476013-60601 अंतर्गत मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 861</u>:– {झो. पु. प्रा.} नागपूर महानगरपालिका अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, तर्फे बेझनबाग–II येथील झोपडपट्टीमध्ये बीएसयुपी अंतर्गत घरकुल योजना राबविण्यात येत असून या अंतर्गत पायाभुत सुविधांचे कामाकरीता निविदा मागविल्या असता मे. अमृत कंस्ट्रक्शन यांची 27.00% जास्त दराची निविदेची वाटाघाटी नंतर 2.00% दर कमी करुन 25.00% अधिक दराची निविदा ही चालू दर सुची नुसार (सन 2016–17) 4.13% अधिक आहे. मंजूर करण्याचा तसेच या निविदेतील महानगरपालिकेचा हिस्सा रु. 9.60 लक्ष ची तरतूद पद क्र. A 476013-60601 अंतर्गत मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 862</u>:– {पिंच प्रकल्प कक्ष} नागपूर शहरातील पी.एम.जी. कॉलोनी येथील उद्दयानामध्ये में. डॉयको एक्सीस कंपनी लीमीटेड, निसावा सीटी, इहीमी जापान द्वारा 10,000.00 लीटर्स प्रतिदिवस क्षमतेचे मलःनिस्सारण केन्द्र नागपूर म.न.पा. ला विनामुल्य प्राप्त झाले होते संपूर्ण यंत्रणा उभारण्याकरीता स्थापत्य कामावर एकूण रु. 205033.00 खर्च झालेला आहे.

या मलःनिस्सारण केन्द्राला भविष्यात देखरेख व देखभाली करीता प्रतिमाह 1000 युनिट प्रमाणे प्रतिवर्ष रु. 1,20,000 विद्युत खर्च अपेक्षीत असून में श्री. कंन्सट्रक्शन, नागपूर यांचे द्वारा निविदा न बोलाविता करण्यात आलेल्या स्थापत्य कामाचे एकूण रुपये 205033.00 चे खर्चास कार्योत्तर मंजूरी व भविष्यातील देखभालीचा खर्च प्रतिवर्ष रु. 1,20,000/– च्या खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 863</u>:– {प्रवर्तन विभाग} नागपूर शहरातील शिकस्त घरे, अवैध बांधकामे वाहतूकीस अडथळा निर्माण करणारे अतिक्रमणे/बांधकामे, तसेच स्थावर विभाग, आरोग्य विभाग, चुंगी विभाग, शिक्षण विभाग, गल्लीच्छ वस्ती/स्लम विभाग या विभागाकडून प्राप्त होणा–या तक्रारी, फुटपाथ, रोडस्लोप, सार्वजनिक रस्ते यावरील तात्पुरते अतिक्रमणे काढणे, तसेच शासकिय कार्यालये याचे अधिनस्त असलेल्या मालकीच्या जागेवरील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे काढण्याची कारवाई क्षेत्रीय कार्यालयातर्फे प्रवर्तन विभागाच्या सहकार्याने करण्यात येते.

प्रवर्तन विभागात तीन चमु दररोज वेगवेगळया झोनमध्ये अतिक्रमण निर्मुलन कार्यवाही करीता जात असून, त्यांचेकडे शिकस्त घरे, अवैध बांधकाम तसेच रोडस्लोप वरील अतिक्रमण काढण्याचे व तोडण्याचे काम करीत असतात. सध्या प्रवर्तन विभागाकडे नियंत्रण अधिकारी – 1, प्रवर्तन अधिक्षक – 1, स्था. अभि. सहाय्यक – 5, कनिष्ठ लिपीक – 1, हवालदार – 3, सुतार – 1, गॅगमन/मजदूर/ऐवजदार कर्मचारी मिळून 40 ऐवढे मनुष्यबळ प्रवर्तन विभागाकडे उपलब्ध आहे. सध्या प्रवर्तन विभागाकडे 3 ट्रक, 1 मिनीबस, 1 जिप व 1 जे.सी.बी ऐवढी यंत्रणा उपलब्ध आहे.

करीता प्रवर्तन विभागातील अतिक्रमण निर्मुलन कार्यवाही करीता प्रति दिवस प्रती चमु रूपये 20,000/– या प्रमाणे गॅगखर्च वसूल करावयाचे आहे. तसेच या कार्यवाहीमध्ये जे.सी.

बी.ची आवश्यकता असल्यास, जे.सी.बी.चा खर्च प्रती तास रूपये 500/– अतिरिक्त आकारण्यात येईल.

गॅगखर्चाचे संक्षिप्त वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | चमु/साहित्य | प्रतीदिवस खर्च |
|---|---|---|
| 1 | पथक | 2500/– |
| 2 | मोहरीर | 1500/– |
| 3 | पोलीस | 9000/– |
| 4 | गॅगमन (10X500) | 5000/– |
| 5 | वाहन चालक व वाहन खर्च | 2000/– |
| **एकुण** | | **20,000/–** |

करीता उपरोक्त प्रमाणे नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील शिकस्त इमारती, अवैध/अनधिकृत बांधकामे तोडण्याची/पाडण्याची दंडणीय रक्कम ही राशी प्रशासकीय शुल्क म्हणुन घेण्याचे प्रस्ताव मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन अर्धा दिवस प्रशासनाद्वारे कार्यवाही झाल्यास रु. 10,000/– शुल्क देण्यांत यावे या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 864</u>:– {वाहतुक विभाग}

सिमेंट कॉक्रिट रस्ते, टप्पा II अंतर्गत पॅकेज 16 मधील दोन रस्ते 1) रस्ता क्र. 20 इतवारी रेल्वे स्टेशन रोड – युनिवर्सल फार्मसी युनीट पासुन ते रिंग रोड कावळापेठ पर्यत व 2) रस्ता क्र. 45 इतवारी रेल्वे स्टेशन रोड – आर ओ बी अप्रोच पासुन ते युनिवर्सल फार्मसी युनीट पर्यंतचा रस्ता या कामाकरीता मे. जे.पी इन्टरप्रायजेस यांना रू. 8,86,00,030/–. चे कार्यादेश क्र.7/सी सी आर डी/2016 दिनांक 18.08.2016 प्राकलनीय दरावर निर्गमीत करण्यात आले आहे. परंतु सदर रस्ता केंद्र शासनाच्या केंदीय मार्ग निधी अंतर्गत समाविष्ट असुन हा रस्ता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनीक बांधकाम विभाग क्र.1 यांचे कडुन कार्यान्वित करण्यात येणार असुन या कामास महाराष्ट्र शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यामुळे पॅकेज क्र 16 मधील रस्ता क्र. 20 व रस्ता क्र. 45 च्या ऐवजी 1) साई लिला अपार्टमेंट ते रिंग रोड कळमना. 2) गिल्लोरगेट डिप्टी सिग्नल ते श्रीक्रिष्ण इंडस्ट्रीज या रस्त्यांचे बांधकाम प्रस्तावित आहे. या कामाकरीता रू. 8,85,63,463/– चे प्राकलन तयार करण्यात आले आहे. अर्थात दोन्ही प्राकलन सुमारे समान राशीचे आहे. हे काम कार्यादेश क्र.7/सी सी आर डी/2016 दिनांक 18.08.2016. अन्वये जुन्या अटी व शर्ती नुसार मे. जे.पी. एन्टरप्रायजेस यांच्याकडुन करण्याचे प्रस्तावित आहे. वरील प्रमाणे स्थळ बदलण्याबाबत मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 865</u>:– {लोककर्म झोन 06}

प्रभाग क्र. ३९ अ अंतर्गत महात्मा गांधी येथे बापूराव लेन ते निकालस मंदीर व सभागृत महादेव महाराज मंदीर आणि पत्रावले ते अग्रवाल यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉक्रींट रोडचे बांधकामास्तव मे. अमित मोहन कर्णे यांची प्राकलनिय दरांपेक्षा १०.००१ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. २६,९९,९६७/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 866</u>:— {लोककर्म झोन 03} प्रभाग क्र. ६७ शिवाजी लॉन (बेसारोड) ते राधानंद नगर येथील रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तीन निविदाकाराची निविदांपैकी मे. पी. एम.ए. कन्ट्रक्शन कंपनी यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ५७,३६,२६६/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 867</u>:— {कार्य. अभि.विद्युत} कवि सुरेश भट सभागृहाचे छतावर ग्रिडला जोडणारे 200 कि. वॅटस सौर उर्जा संयंत्र बसविणे व त्याची 5 वर्षपर्यंत देखभाल करणे या कामाकरीता निविदा बोलविल्या असता प्राप्त 10 निविदांपैकी सर्व अटी व शर्ती पुर्ण करणाऱ्या 4 निविदाकारांपैकी में. ईसीई (इंडीया) एनर्जी प्रा. लि. यांच्या प्राकलनीय दराच्या तुलनेत 21.21 टक्केने कमी म्हणजे रू. 1,18,18,500/—या दरावर निविदा अटीशर्तीनुसार कवि सुरेश भट सभागृहाचे छताचे बांधकाम (ऊभारणी) चे जे काम मे. सादीक अँड कं. करीत आहेत त्यांना या दराने काम करण्याकरीता विचारणा केली असता मे. सादीक अँड कंपनीने सदर काम प्राप्त निम्नतम दर रू. 1,18,18,500/— (प्राकलनीय दरापेक्षा 21.21 टक्केने कमी) प्रमाणे करण्यास तयार असल्याचे संमतीपत्र सादर केले असल्याचे अनुषंगाने या निम्नतम दराने रू. 1,18,18,500/— चे काम में. सादीक अँड कंपनी, नागपूर यांचेकडून करवून घेण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 868</u>:— {झो. पु. प्रा.} नागपूर महानगरपालिका अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, तर्फे लुंम्बीनी नगर येथील झोपडपट्टीमध्ये बीएसयुपी अंतर्गत घरकुल योजना राबविण्यात येत असून या अंतर्गत पायाभुत सुविधांचे कामाकरीता निविदा मागविल्या असता मे. अमृत कंस्ट्रक्श्न यांची 27.00% जास्त दराची निविदेची वाटाघाटी नंतर 2.00% दर कमी करुन 25.00% अधिक दराची निविदा ही चालू दर सुची नुसार (सन 2016—17) 4.13% अधिक आहे. मंजूर करण्याचा तसेच या निविदेतील महानगरपालिकेचा हिस्सा रु. 10.80 लक्ष ची तरतूद पद क्र. A 476013-60601 अंतर्गत मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 869</u>:— {पिंच प्रकल्प} नागपूर शहरातील घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता भांडेवाडी येथे डंपींग यार्ड मधे Waste to Energy च्या प्रकल्पा करीता आलेल्या M/s. Essel Infraprojects Ltd. & Hitachi Zosen India Pvt. Ltd., Mumbai (JV) यांच्या निविदेस मंजूरी मिळण्याबाबत.

सविनय सादर करण्यात येत आहे की, नागपूर शहरातून निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्याची महानगरपालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे. MSW Rules 2016 प्रमाणे घनकचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे हे नियमानुसार बंधनकारक आहे. सद्यस्थिती नागपूर शहरात दररोज अंदाजे 1000-1100 MT घनकचऱ्याची निर्मिती होते. शहराच्या विविध भागातून गोळा होणारा घनकचरा भांडेवाडी डंपींग यार्ड मध्ये नेण्यात येतो. यापैकी 150-200 MT घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत असून उर्वरीत कचरा प्रक्रिया न करता SLF मध्ये व भांडेवाडी परिसरात टाकण्यात येतो.

<u>पार्श्वभूमि:</u>

- भांडेवाडी येथील 22 हेक्टर जागेवर 1966 पासून ते 2008 पर्यंत अवैज्ञानिकरीत्या घनकचऱ्याची विल्हेवाट करण्यात येत होती.

- सन 2008 मध्ये घनकचऱ्याची प्रक्रिया व विल्हेवाट करण्याबाबत BOOT Basis वर निविदा काढण्यात आल्या होत्या. निविदा निवड प्रक्रियेतून मेसर्स हॅजर बायोटेक एनर्जीस प्रा. लि. यांना 15 एप्रिल 2009 ला कार्यादेश देण्यात येवून घनकचरा प्रक्रिया केन्द्र उभारण्यात आले.
- दि. 21-05-2011 ला प्लान्टमध्ये लागलेल्या आगीमुळे segregation & machinery पूर्णपणे जळाल्या व प्लान्ट बंद पडला. प्लान्ट सुरु करण्याबाबत ऑपरेटरला सांगण्यात आले परंतू प्लान्ट सुरु होवू शकला नाही.
- यामुळे देशपांडे जनसमस्या निर्वारण समिती द्वारे भांडेवाडी येथील MSW plant मुळे होणाऱ्या प्रदुषणाबाबत जनहित याचिका क्र. 44/2011 मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. मा. उच्च न्यायालयाद्वारे सदर याचिका राष्ट्रीय हरीत लवाद (पश्चिम विभाग) (NGT) कडे वर्ग करण्यात आली. राष्ट्रीय हरीत लवादाद्वारे दि. 22 एप्रिल 2014 ला NMC व MPCB यांना time bound program द्वारे योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. तसेच मेसर्स हॅजर बायोटेक एनर्जीस प्रा. लि. यांना प्लान्ट पुर्वस्थितीत आणण्याचे निर्देश दिले.
- NGT द्वारे दि. 1 ऑक्टों. 2014 ला मेसर्स हॅजर बायोटेक एनर्जीस प्रा. लि. यांचे मागील काळातील Performance बघता कुठल्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येवू नये असे सूचविले. जर आर्थिक मदत दयावयाची असेलच तर tax consultant च्या मदतीने सुरक्षा ठेव स्वरुपात ऑपरेटरची चल–अचल संपत्ती Mortgage करुनच पुढील कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश दिले.
- NGT च्या निर्देशानुसार मेसर्स हॅजर बायोटेक एनर्जीस प्रा. लि. यांना पत्र देवून घनकचरा प्रक्रिया 200 टनापर्यंत सिमित करण्यात आली.
- प्लान्टद्वारे निर्मित Compost व RDF ला बाजारात उठाव नसल्यामुळे ऑपरेटरच्या आर्थिक अडचणीत वाढ झाली त्यामुळे महानगरपालिकेद्वारे इलेक्ट्रिक बिलाचा भरणा करण्यात येत आहे. महानगरपलिकेची घनकचरा व्यवस्थापन व प्रक्रियेची प्राथमिक जबाबदारी असल्याने उपरोक्त निर्णय घेण्यात आला. महानगरपलिकेच्या मदतीमुळे सद्यस्थितीत ऑपरेटर 200 MT पर्यंत कचऱ्याची विल्हेवाट करीत आहे.
- उर्वरीत कचरा SLF मध्ये व भांडेवाडी परिसरात प्रक्रिया न करता टाकण्यात येतो.
- मा. उच्च न्यायालयात असलेली जनहीत याचिका क्र. 44/2011 व तसेच राष्ट्रीय हरीत लवाद, पुणे (NGT) application No. 32(THC)/2013(WZ) येथे देशपांडे लेआउट यांनी सादर केलेल्या तक्रारीवर वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे नागपूर महानगरपालिकेने तांत्रिक सल्लागार मेसर्स आर. जगताप ॲन्ड असोसिएट, नागपूर यांना अधिकृतपणे नियुक्ती केली व त्याप्रमाणे मनपाद्वारे 800 टन प्रतिदिन घनकचरा प्रक्रियेकरीता EOI मागविण्यात आले. EOI प्रमाणे अभिकर्त्यांची व मनपाचा जबाबदारी पुढीलप्रमाणे होत्या.

<u>अभिकर्त्याची जवाबदारी</u> :

- संपूर्ण घनकचरा प्रक्रिया प्रकल्प (capacity 800 MT/day) व संबधित प्रकल्प उभारणे.
- व्यवस्थापन प्रक्रिया व संबधित देखभाल व दुरूस्ती किमान 15 वर्ष करणे अपरीहार्य आहे.
- अस्तित्वात असलेल्या SLF ची देखभाल किमान 15 वर्ष करणे अपरीहार्य आहे.
- संपूर्ण प्रक्रिया व देखभाल ही भारत सरकारच्या (Ministry of Environment and Forest (MOEF)) व्दारे घनकचरा व्यवस्थापन नियमांनूसार (MSW Rules 2000) निर्देशित असावे.

<u>महानगरपालिकेची जवाबदारी</u> :

- घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाला लागणारी जागा देणे.
- दररोज 800 MT/day घनकचरा देणे.
- प्रस्तावित घनकचरा प्रक्रिया शुल्क (Tipping Fees) देणे.
- महानगरपलिकाव्दारा आर्थिक मदत शुन्य (Zero Funding).

यात 6 निविदाकारांनी (M/s Ecofill Technologies India Pvt. Ltd., Navi Mumbai, M/s. Essel Infraprojects Ltd. & Hitachi Zosen India Pvt. Ltd., Mumbai (JV), M/s Hydroair Tectonics (PCD) Ltd., Navi Mumbai, M/s IL&FS Environmental Infrastructure & Services Ltd., New Delhi, M/s Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad, M/s SMS Envocare Ltd., Nagpur) EOI सादर केला. यापैकी 5 निविदाकारांना Select करुन RFP documents देण्यात आले. निविदाकारांच्या विनंतीनुसार document submit करण्याची तारीख 27 मार्च 2015 वरुन 20 एप्रिल 2015 पर्यंत वाढविण्यात आली. यांत M/s Essel Infraproject Ltd., Mumbai यांनीच फक्त निविदा सादर केली.

नविन ऑपरेटर नेमणूकी संदर्भात मनपाला प्राप्त झालेल्या एकमेव निविदेसंदर्भात माहिती NGT ला दि. 8 मे 2015 ला सादर करण्यात आली. यावर राष्ट्रीय हरीत लवादाद्वारे निर्देशित NEERI व Gokhale Institute of Politics & Economics, Pune द्वारे प्रमाणित अहवाल मार्फत सादर निविदेची Techno economic feasibility & appropriateness करण्यास सांगितले.

<u>प्राप्त दर</u>:

निविदेप्रमाणे निम्नतम Tipping Fees वर काम देणे हे ग्राहय होते. M/s. Essel Infraprojects Ltd. & Hitachi Zosen India Pvt. Ltd., Mumbai (JV) यांनी सादर केलेल्या आर्थिक निविदेमधे त्यांनी Tipping Fees रु. 750/MT व त्यावर वार्षिक 4.5% नी वाढ दिली होती. या निविदेचे आर्थिक निविदा तपासणी मा. राष्ट्रीय हरीत लवाद, पुणे (NGT) नी दिलेल्या निर्देशाप्रमाणे Gokhale Institute of Politics & Economics, Pune नी केली. या विश्लेषणामध्ये वरील Tipping Fees वर Project IRR 12.62% व Equity IRR 14.76% एवढे आले आहे. तसेच निर्मित होणारे विजेचे दर यामध्ये Levellised Tariff Rs. 5.86/unit हे गृहीत धरले होते.

- त्यानुसार NEERI द्वारे मनपास सादर अहवाल तसेच वित्तीय बाबी संदर्भात दिलेल्या निर्देशाप्रमाणे Gokhale Institute of Politics & Economics, Pune द्वारे प्रमाणित अहवाल NGT ला सादर करण्यात आला. NGT द्वारे दि. 5-11-15 ला दिलेल्या आदेशाप्रमाणे प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यास हरकत नसावी असे म्हटले आहे.
- केन्द्रशासनाने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मार्गदर्शन तक्ता डिसेंबर 2014 मध्ये निर्गमित केले. त्या अनुषंगाने राज्यशासनाने 15 मे 2015 ला काढलेल्या शासन निर्णयानुसार स्वच्छ महाराष्ट्र मिशन राबविण्याकरीता शहरांना घनकचरा व्यवस्थापण प्रकल्पांकरीता अनुदान (Financial Assistance) देणे प्रास्तावित होते.

नागपूर शहरातील एकीकृत घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत मेसर्स आर जगताप ॲन्ड असोसिएट्स, कन्सलटंट यांचेमार्फत तयार केलेले विस्तृत प्रकल्प अहवाल स्वच्छ भारत मिशन अंतर्गत अनुदान प्राप्त करण्याकरीता राज्यशासनाकडे सादर करावयाचे होते. राज्यशासनाने सूचविल्याप्रमाणे सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवाल (रु. 308.00 कोटी) स्वच्छ भारत मिशन अंतर्गत अनुदान प्राप्त करण्याकरीता राज्यशासनाकडे सादर करण्यात आले असता स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीची दिनांक 22-3-2016 रोजी झालेल्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आलेली आहे. या अनुषंगाने मनपास **रु.** 57,73,59,600/— केन्द्रशासनाचा हिस्सा व **रु.** 38,49,06,015/— राज्यशासनाचा हिस्सा असा एकूण रु. 96,22,65,615/— अनुदानाच्या स्वरुपात देण्यास मंजूरी प्राप्त आहे.

या (रु. 308.00 कोटी च्या प्रकल्प अहवालाला केन्द्र व राज्यशासनाची मंजूरी प्राप्त आहे. यामधून Waste to Energy प्रकल्प उभा करण्याकरीता M/s Essel Infroproject Ltd. (JV) यांचे या प्रकल्पाकरीता Capital Cost रु. 251.62 कोटी मध्ये मनपाद्वारे शासकीय अनुदानातून रु. 70.00 कोटी देण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे निविदेकाराने दिलेल्या मुळ दरामध्ये बराच फरक होणार असून मनपाला दयावयाची Tipping Fees मधे बचत होवून मनपाचा आर्थिक फायदाच होणार आहे. मिळालेले अनुदान जर का या प्रकल्पामध्ये वापरल्या गेले नाही तर ते परत शासनाला वळते करावे लागेल.

- या अंतर्गत Waste to Energy प्रकल्पाकरीता M/s. Essel Infraprojects Ltd. & Hitachi Zosen India Pvt. Ltd., Mumbai (JV), यांना दि. 29-04-2016 ला Letter of Intent देण्यात आले आहे. प्रारुप करारनामा हा मनपाचे कायदेशीर सल्लागार यांचेकडे legal vetting करीता सादर करण्यात आले आहे. तसेच या प्रकल्पामध्ये स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मिळणारा अनुदान तसेच Maha Discom द्वारे Generic Tariff for Electricity from Waste to Energy या बाबी लक्षात घेवून त्यांचेशी वाटाघाटी करणे गरजेचे होते. त्याअनुषंगाने संबंधित मनपाचे अधिकारी, या कामाचे सल्लागार मेसर्स आर. जगताप ॲन्ड असोसिएट, नागपूर, आर्थिक सल्लागार Gokhale Institute of Politics & Economics, Pune तथा M/s. Essel Infraprojects Ltd. & Hitachi Zosen India Pvt. Ltd., Mumbai (JV), यांचेशी वाटाघाटी करीता चर्चा करण्यात आली. Bidder नी दिनांक 23 ऑगस्ट 2016 ला ईमेलद्वारे सादर केलेल्या ऑफर मध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख आहे.

| | |
|---|---|
| Tipping Fees | 285 /MTs |
| Capex | Rs. 241.12 Crs. |
| Grant | Rs. 70.00 Crs. |
| Project IRR | 16.15% |
| Levellised Tariff (in Rs.) | 7.04 |

यावर मनपाने Gokhale Institute of Politics & Economics, Pune यांना CERC च्या नविन Guidelines च्या आधारे वरील दर तपासून सादर करण्याबाबत कळविण्यात आले. त्याअनुषंगाने त्यांनी काढून दिलेले दर पुढीलप्रमाणे आलेले आहे.

| | |
|---|---|
| Tipping Fees | 255 /MTs |
| Capex | Rs. 241.12 Crs. |
| Grant | Rs. 70.00 Crs. |
| Project IRR | 15.98% |
| Levellised Tariff (in Rs.) | 7.04 |

Tipping fees व Project IRR करीता गृहीत धरण्यात आलेल्या बाबींचा विवरण पुढीलप्रमाणे आहे.

*Rs. in Crores*

**Major Input & Assumptions**

| | |
|---|---|
| Bid Due Date | 20-Mar-15 |
| Construction Period for Processing Plant | 0 Months |
| Construction Period for Elec. Gen. Plant | 24 Months |
| Concession Period | 15.00 Years |
| Project Capacity | 800 TPD |
| EPC Cost | **218.80** |
| Financing Cost, IDC & Pre-Operative Exp. (% of EPC) | 15.00% |
| Yearly Increase in O&M Expenses | 5.72% |
| Debt Equity Ratio | **2.33:1** |
| Door-to-Door Loan Tenure | 12.00 Years |
| Moratorium Period post COD (in years) | 0.50 Years |
| Interest Rate (p.a.) | **13.00%** |
| **Tipping Fee for Processing of Waste (Rs. per Tonne)** | **255.00** |
| Yearly Increase in Tipping Fee for Processing of Waste | **4.50%** |
| Insurance Expenses (%) | 0.09% |
| O&M - Processing | 13.00 |
| O&M - Landfill | 0.60 |
| Periodic Maintenance Cost | 0.50 |
| Gross MW Generation | **11.50** |

**Output**

| | |
|---|---|
| EPC Cost | 218.80 |
| Financing Cost, IDC & Pre-Operative Exp. | 22.32 |
| **EIL's Total Project Cost** | **241.12** |

| | |
|---|---|
| Promoters' Equity | 51.33 |
| Govt. Grant in Aid (NMC) | 70.00 |
| Sr. Debt Funding | 119.78 |
| **Total Means of Finance** | **241.12** |

| | |
|---|---|
| **Project IRR** | **15.98%** |
| **Equity IRR** | **22.52%** |

| | |
|---|---|
| **Avg. DSCR** | **1.73** |
| Min. DSCR | 1.25 |

| | |
|---|---|
| Auxiliary consumption (%) | 15.00% |
| PLF: 1st year | 60.00% |
| PLF: 2nd year | 80.00% |
| PLF: 3rd year onwards | 85.00% |
| Levellised Tariff (in Rs.) | **7.04** |

वाटाघाटीचा तपशील :

संपूर्ण प्रक्रिया मा. आयुक्तांपुढे सादर करण्यात आली व त्यांच्या समक्ष दि. 23-08-2016 आणि दि. 8-9-2016 रोजी कंत्राटदाराशी वाटाघाटी करण्यात आल्या. तद्नंतर मा. आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे निविदेकाराला वाटाघाटी करीता त्यांच्या कक्षात आमंत्रित करण्यात आले. मा. आयुक्त व अति. आयुक्त यांच्या समक्ष झालेल्या चर्चेस अनुसरुन दि. 14-09-2016 च्या पत्रान्वये त्यांनी आपली Tipping Fees चे सुधारीत दर रु 225/MT हे दिलेले असून या दरामध्ये दरवर्षी 4.5% नी वाढ मागितलेली आहे.

सुधारीत दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत पुन:श्च तपासणी करीता मा. मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, संबंधित अधिकारी व या कामाचे सल्लागार यांच्या मध्ये चर्चा करण्यात आली. चर्चेमध्ये मा. मुख्य अभियंता यांनी सूचविल्याप्रमाणे मुळ आर्थिक निविदेमध्ये जर Project IRR (12.62%) व Levellised Tariff (रु. 5.86/unit) न बदलता रु. 70.00 कोटी VGF म्हणून प्रकल्पामध्ये capital investment मनपाने केले तर Tipping Fees ही किती निघेल हे तपासण्यास सूचविले. Gokhale Institute of Politics & Economics, Pune यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार अहवालातील मुळ बाबी जसे EPC Cost, Yearly Increase in Tipping Fees, Project IRR etc. समान ठेवून रु. 70.00 कोटी VGF मनपाने प्रकल्पामध्ये निवेश केले तर Tipping Fees ची रक्कम रु. 389/MT एवढी आलेली आहे. तथापि Operator नी दिनांक 28 नोव्हेंबर 2016 ला दिलेल्या पत्रान्वये Tipping Fees रु. 225/MT ची मागणी केलेली आहे. त्यामुळे वाटाघाटी केल्यानंतरचे दर रु. 225/MT हे या रक्कमेपेक्षा कमी आहे.

*Rs. in Crores*

**Major Input & Assumptions**

| | |
|---|---|
| Bid Due Date | 20-Mar-15 |
| Construction Period for Processing Plant | 0 Months |
| Construction Period for Elec. Gen. Plant | 24 Months |
| Concession Period | 15.00 Years |
| Project Capacity | 800 TPD |
| EPC Cost | **218.80** |
| Financing Cost, IDC & Pre-Operative Exp. (% of EPC) | 15.00% |
| Yearly Increase in O&M Expenses | 6.50% |
| Debt Equity Ratio | **2.33:1** |
| Door-to-Door Loan Tenure | 13.00 Years |
| Moratorium Period post COD (in years) | 0.50 Years |
| Interest Rate (p.a.) | 12.75% |
| **Tipping Fee for Processing of Waste (Rs. per Tonne)** | 389.00 |
| Yearly Increase in Tipping Fee for Processing of Waste | **4.50%** |
| Insurance Expenses (%) | 0.15% |
| O&M - Processing | 14.00 |
| O&M - Landfill | 0.60 |
| Periodic Maintenance Cost | 0.50 |
| Gross MW Generation | **11.50** |
| Auxiliary consumption (%) | 16.00% |
| PLF: 1st year | 60.00% |
| PLF: 2nd year | 80.00% |
| PLF: 3rd year onwards | 85.00% |
| Levellised Tariff (in Rs.) | **5.86** |

**Output**

| | |
|---|---|
| EPC Cost | 218.80 |
| Financing Cost, IDC & Pre-Operative Exp. | 22.32 |
| **EIL's Total Project Cost** | **241.12** |

| | |
|---|---|
| Promoters' Equity | 51.33 |
| Govt. Grant in Aid (NMC) | 70.00 |
| Sr. Debt Funding | 119.78 |
| **Total Means of Finance** | **241.12** |

| | |
|---|---|
| **Project IRR** | **12.62%** |
| **Equity IRR** | **15.21%** |

| | |
|---|---|
| **Avg. DSCR** | **1.55** |
| Min. DSCR | 1.11 |

सबब, Operator नी मुळ सादर केलेली Tipping Fees रु. 750/MT व तद्नंतर VGF मिळाल्यामुळे दिनांक 19 मे 2016 ला त्यांनी दिलेले Tipping Fees चे दर रु. 385/MT व त्यानंतर झालेल्या वाटाघाटीमध्ये दिनांक 23 ऑगस्ट 2016 ला फेरसादर केलेले Tipping Fees दर रु. 285/MT व अंतिम दर रु. 225/MT व त्यावर 4.50 टक्क्याची वार्षिक वाढ दिनांक 28 नोव्हेंबर 2016 ला सादर केलेली आहे.

ही संपूर्ण बाब मनपाचे सल्लागार मेसर्स आर. जगताप ॲन्ड असोसिएट, नागपूर यांच्याकडून तपासून घेण्यात आली व त्यांचा अभिप्राय सुध्दा मागविण्यात आले आहे. त्यांनी दि. 26 सप्टेंबर 2016 ला मनपास सादर केलेल्या Evaluation Report मध्ये पान क्र. 66, 67 व 68 मध्ये व वाटाघाटी नंतर दिनांक 2 डिसेंबर 2016 ला दिलेल्या पत्रामधील अभिप्रायानुसार हा प्रकल्प मनपाच्या हिताचा आहे. असे सुस्पष्ट अभिप्राय दिले आहेत.

मा. मुख्य अभियंता, महावितरण, मुंबई यांचेकडून दि. 22-11-2016 ला आलेल्या पत्रान्वये रु. 7.04 प्रति यूनिट हा दर जास्त असल्यामुळे त्या दराची खात्री देता येत नाही असे कळविण्यात आले आहे. तसेच महावितरणनी कोल्हापूरसाठी रु. 5.49 असा दर ठरविण्यात आलेला आहे तसेच हा दर निश्चित गृहित धरता येणार नाही असे सुध्दा कळविले आहे. निविदा निश्चिती झाल्यानंतर MERC यांच्याकडे संपर्क साधून Operator ला दर निश्चित करुन घ्यावा लागेल. असे नमूद केले आहे.

या प्रकल्पाकरीता M/s. Essel Infraprojects Ltd. & Hitachi Zosen India Pvt. Ltd., Mumbai (JV), यांच्या निविदेस व वाटाघाटी नंतर त्यांनी Tipping Fees चे दर रु. 225/MT व त्यावर 4.5% वार्षिक दरवाढ (irrespective of power tariff) असा अंतिम देकार दिनांक 28 नोव्हेंबर 2016 ला दिलेल्या पत्रामध्ये सादर केला आहे.

| Major Input, Output & Assumptions | *Rs. in Crores* | | | |
|---|---|---|---|---|
| | **Proposal as per Bidders Original Offer** | **Proposal as per CERC guidelines submitted by GIPE to NGT** | **Proposal as per New CERC & SBM guidelines +VGF** | **Proposal as per final offer + VGF** |
| EPC Cost | **218.80** | **218.80** | **218.80** | **218.80** |
| Financing Cost, IDC & Pre-Operative Exp. (15% of EPC) | 32.82 | 32.82 | 22.32 | 22.32 |
| Govt. Grant in Aid (NMC) | 0.00 | 0.00 | 70.00 | 70.00 |
| Capex | 251.62 | 251.62 | 241.12 | 241.12 |
| Yearly Increase in O&M Expenses | 6.50% | 5.72% | 5.72% | 6.50% |
| Debt Equity Ratio | **2.33:1** | **2.33:1** | **2.33:1** | **2.33:1** |
| Door-to-Door Loan Tenure | 13.00 Years | 13.00 Years | 13.00 Years | 13.00 Years |
| Interest Rate (p.a.) | **12.75%** | **13.00%** | **13.00%** | **12.75%** |
| Tipping Fee for Processing of Waste (Rs. per Tonne) | **750.00** | **750.00** | **255.00** | **225.00** |
| Yearly Increase in Tipping Fee for Processing of Waste | **4.50%** | **0.00%** | **4.50%** | **4.50%** |
| Insurance Expenses (%) | 0.15% | 0.15% | 0.15% | 0.15% |
| O&M - Processing | 14.00 | 8.63 | 13.00 | 14.00 |
| O&M - Landfill | 0.60 | 0.60 | 0.60 | 0.60 |
| Periodic Maintenance Cost | 0.50 | 0.50 | 0.50 | 0.50 |
| Gross MW Generation | **11.50** | **11.50** | **11.50** | **11.50** |
| Auxiliary consumption (%) | 16.00% | 16.00% | 15.00% | 16.00% |
| PLF: 1st year | 60.00% | 60.00% | 60.00% | 60.00% |
| PLF: 2nd year | 80.00% | 80.00% | 80.00% | 80.00% |
| PLF: 3rd year onwards | 85.00% | 85.00% | 85.00% | 85.00% |
| Levellised Tariff (in Rs.) | **5.86** | **6.82** | **7.04** | **5.86** |
| **Project IRR** | **12.62%** | **17.32%** | **15.98%** | **8.86%** |
| **Equity IRR** | **14.76%** | **26.18%** | **22.52%** | **5.85%** |

मा. मुख्य अभियंता यांच्या दि. 17-10-16 च्या ज्ञापन पान क्र. 48 च्या निर्देशामध्ये नमूद प्रमाणे मुळ cash flow रु. 164/MT हा दर रु. 7.04 विजेचे दर (per unit) प्रमाणे येतो. परंतू जर का आपरेटरला विजेचे दर रु. 7.04 मिळाले तरी वाटाघाटीतील दरानुसार रु. 164/MT ऐवजी 225/MT हा दर दयावा लागेल.

वरील पार्श्वभूमीवर रु. 5.86 हा विजेचा दर गृहीत धरल्यास tipping Fee रु. 389 ऐवढा येतो व वाटाघाटी अंती बिडरने ही tipping Fee रु. 225 प्रति मेट्रिक टन व त्यावर 4.50 टक्के वार्षिक दरवाढ (irrespective of power tariff) असे अंतिम देकार दिला आहे. तो रु. 5.86 विजेचा दर असे पर्यंत स्विकारार्थ ठरतो. भविष्यात MERC यांच्याकडे रु. 5.86 पेक्षा जास्त दर दिल्यास वाढीव दराचे उत्पन्न महानगरपालिकेचे राहील या अटीवर M/s. Essel Infraprojects Ltd. & Hitachi Zosen India Pvt. Ltd., Mumbai (JV) खालिलप्रमाणे पत्र व्यवहार करण्यात आले. (दि. 13 डिसेंबर 2016 चे पत्र)

१. आर्थिक निविदांची वैधता कालावधी वाढविण्यास संमती.
२. आर्थिक निविदेस गृहित धरण्यात आलेले Levellised Tariff रक्कम रु. 5.86 पेक्षा अधिक मिळण्यास होणारा नफा महानगरपालिकेस Tipping Fees चे दर कमी करण्यास संमती देणे.

त्यास अभिकर्त्याने ईमेल दि. 14-12-2016 च्या पत्रामधे दिल्याप्रमाणे नफा वळता करण्याची अट मान्य न करता इतर बाबीस सहमती दिली आहे. त्यामुळे M/s. Essel Infraprojects Ltd. & Hitachi Zosen India Pvt. Ltd., Mumbai (JV) यांनी वाटाघाटी नंतरचे दि. 28 नोव्हेंबर 2016 चे tipping fees चे दर रु. 225/MT व त्यावर 4.5% ची वार्षिक दरवाढ (Irrespective of Power Tariff) असा अंतिम देकार सादर केलेला आहे. महानगरपालिकेने कळविलेली बाब व बिडरचे उत्तर पुढीलप्रमाणे आहे.

**Point raised by NMC :** As on date the levellised tariff is not fixed and therefore if the rate finalized by MERC is more than Rs. 5.86 per unit, the benefits due to higher Levellised tariff shall be passed to NMC by proportionately reducing the tipping fees. However if the finalized tariff is below Rs. 5.86 per unit, NMC shall not be responsible for same and same shall not be compensated by NMC by way of increasing the tipping fees.

**Reply of Bidder :** Sharing of Tariff is not good proposition for this type of project. Hence we are not accepting this clause.

अभिकर्ता M/s. Essel Infraprojects Ltd. & Hitachi Zosen India Pvt. Ltd., Mumbai (JV) यांनी दि. १७.१२.२०१६ ला दिलेल्या पत्रामधे नमूद केल्याप्रमाणे Power Tariff मधील कमी किंवा जास्त दरावर कुठल्याही प्रकारची भागीदारी करण्यास नकार दिलेला आहे.

**Project Lifecycle Cost for Tipping Fees**

वाटाघाटीचा अंतिम दर रु. 225 प्रति मेट्रिक टन मान्य करुन त्यात वार्षिक वाढ 4.5% आणि मनपामार्फत रु. 70 कोटी अभिकर्त्यास 2 वर्षात VGF म्हणून दिल्यास प्रकल्पाची Lifecycle Cost पुढीलप्रमाणे येते.

NPV of tipping fees for final proposal submitted by Bidder

**NPV for Processing and Disposal of MSW on DBFOT Basis for Nagpur City**

| | | | |
|---|---|---|---|
| NPV | = | Ct / (1+r)t | |
| Ct | = | | The net cash flow |
| r | = | 12.00% | The discount rate |
| t | = | 15 | the time of the cash flow |

| Year | Yrs (t) | Rate (%) r | Qty. | No. of days | Qty. in Tons per year | Fee per Ton (Rs) | VGF / Annual Tipping Fee (Rs.) | NPV |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2017 | 1 | 8.00% | | 365 | 0 | 0 | 350000000 * | 324074074 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2018 | 2 | 8.00% | | 365 | 0 | | 350000000 * | 300068587 |
| 2019 | 3 | 12.00% | 800 | 182.5 | 146000 | 225 | 32850000 | 23381981 |
| 2020 | 4 | 12.00% | 800 | 365 | 292000 | 235 | 68656500 | 43632447 |
| 2021 | 5 | 12.00% | 800 | 365 | 292000 | 246 | 71746042.5 | 40710631 |
| 2022 | 6 | 12.00% | 800 | 365 | 292000 | 257 | 74974614.41 | 37984473 |
| 2023 | 7 | 12.00% | 800 | 365 | 292000 | 268 | 78348472.06 | 35440870 |
| 2024 | 8 | 12.00% | 800 | 365 | 292000 | 280 | 81874153.3 | 33067597 |
| 2025 | 9 | 12.00% | 800 | 365 | 292000 | 293 | 85558490.2 | 30853249 |
| 2026 | 10 | 12.00% | 800 | 365 | 292000 | 306 | 89408622.26 | 28787183 |
| 2027 | 11 | 12.00% | 800 | 365 | 292000 | 320 | 93432010.26 | 26859470 |
| 2028 | 12 | 12.00% | 800 | 365 | 292000 | 334 | 97636450.73 | 25060845 |
| 2029 | 13 | 12.00% | 800 | 365 | 292000 | 349 | 102030091 | 23382663 |
| 2030 | 14 | 12.00% | 800 | 365 | 292000 | 365 | 106621445.1 | 21816860 |
| 2031 | 15 | 12.00% | 800 | 365 | 292000 | 382 | 111419410.1 | 20355910 |
| | | | | | | Rs. | **1794556302** | 1015476842 |

(* VGF amount to be given to the concessioner by way of VGF during the construction period)

अभिकर्ता यांनी सादर केलेल्या आर्थिक निविदेप्रमाणे रु. 750/MT प्रमाणे Tipping Fees दिली तर प्रकल्पाची life cycle cost रु. 364.85 कोटी एवढी येत आहे आणि रु. 225/MT दिल्यास प्रकल्पाचे Life cycle cost रु. 179.45 कोटी एवढी आहे. यामध्ये रु. 70.00 कोटी हे शासनाचे अनुदान असल्यामुळे मनपाला रु. 109.45 कोटी एवढी रक्कम दयावी लागणार आहे. ही बाब पाहता मनपाचे जवळजवळ रु. 255.40 कोटी ची (364.85-109.45 कोटी) बचत होवू शकेल. याप्रमाणे यामधे मनपाचा आर्थिक फायदाच होणार आहे.

**<u>प्रकल्प अंमलबजावणीमुळे होणारे फायदे</u>**

- कचऱ्याचे शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यास मदत होईल आणि पर्यावरण संरक्षणास मदत होईल.
- घनकचऱ्यातून अंदाजे 11.5 MW ऊर्जा निर्मिती होईल.
- लॅडफिलला लागणारी मौल्यवान जमीन कमी लागेल.
- लॅडफिलला जाणाऱ्या अवशेषाचे (inert) चे प्रमाण कमी होईल.

**वाटाघाटी अंती प्राप्त Tipping Fees चे दर रु. 225/MT करण्याबाबत प्रशासनाने शिफारस करण्यामागची कारण मिमांसा**

1. या प्रकल्पाची निविदा सन 2014 मधे प्रकाशित करण्यात आली असून ही निविदा प्रक्रिया पूर्ण होईस्तव 2016 म्हणजेच जवळ जवळ 2 वर्षाचा कालावधी लोटल्यामुळे प्रकल्पासाठी आवश्यक भांडवली गुंतवणूक /capital cost मधे निश्चितच वाढ झाली आहे तथापि, अभिकर्तानि मुळ किंमतीत वाढ सुध्दा आहे. पण अभिकर्त्याने मूळ प्रकल्पीय राशी गृहीत धरुनच त्यांचे सुधारीत दर सादर केलेले आहे.
2. Mahadiscom यांचे पत्र दिनांक 22.11.2016 मधे रु. 7.04 प्रति युनिट हा दर जास्त असून सध्या त्यांचेजवळ अतिरिक्त विजेची निर्मिती होत आहे. असे नमूद केले आहे. त्यामुळे levellised tariff बाबतची अनिश्चितता सदर प्रस्ताव स्विकारताना विचारात घेणे आवश्यक आहे.
3. अभिकर्त्याने या प्लॉटमधून अंदाजे 11.50 KV वीज निर्मिती करण्याचे अपेक्षित आहे. वीज निर्मिती करणे त्यांना प्राप्त होणाऱ्या कचऱ्याच्या quality (Calorific value) वर निर्भर असल्यामुळे वीज निर्मिती कमी अथवा जास्त होवू शकते.

4. हा प्रकल्प PPP तत्वावर असून वित्तीय दायीत्व व जबाबदाऱ्या जोखीम लक्षात घेता अभिकर्त्याने दिलेले सुधारीत दर रु. 225/- प्रति टन हा वाजवी वाटतो.
5. अशा प्रकल्पामध्ये संभाव्य आर्थिक धोका लक्षात घेता व प्रकल्प दिर्घकाल चालावा या दृष्टीने Tipping fees चे दर व Levellised Tariff of Power generated from such type of projects should be generous & workable असे AFD याच्याशी झालेल्या चर्चेमधे सुध्दा त्यांच्या मार्फत सूचविण्यात आलेले आहे. यामध्ये अभिकर्त्याला भविष्यात कोणताही अतिरिक्त फायदा होणार नाही याची दक्षता म्हणून MERC ला NMC कडून देण्यात येणाऱ्या Tipping fees बाबत कळविण्यात येईल.

**प्रस्ताव :**

सबब, MSW Rules 2016 मधील तरतूदी व National Green Tribunal (NGT) चे निर्देश लक्षात घेवून NEERI व Gokhale Institute of Politics & Economics, Pune द्वारे तांत्रिक व आर्थिक निविदा तपासणी, मेसर्स आर जगताप ॲन्ड असोसिएट्स यांची शिफारस, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मिळालेली मंजूरी आणि निविदाकार यांनी विजेच्या दरातील चढ उताराशी काहीही संबंध न ठेवता रु. 225/MT (4.5 टक्के वार्षिक चक्रवाढीसह) tipping Fees असा दिलेला देकार, पर्यावरण संरक्षण व लोकांचे आरोग्य लक्षात घेता पुढीलप्रमाणे प्रस्ताव सादर आहे.

1. या प्रकल्पाकरीता भांडेवाडी येथील आरक्षित जागेतून 6 एकर जागा 15 वर्षाकरीता भोगवाटयाने बिनाशुल्क जागा देणे.
2. शहरातून निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यापैकी 800 MT घनकचरा प्रक्रियाकरीता प्रकल्प स्थळावर पुरविणे.
3. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत प्राप्त झालेले अनुदान रु. 96.22 कोटी पैकी रु. 70.00 कोटी या प्रकल्पाकरीता VGF म्हणून अभिकर्त्यास देणे.
4. अभिकर्ता M/s. Essel Infraprojects Ltd. & Hitachi Zosen India Pvt. Ltd., Mumbai (JV) यांनी वाटाघाटी अंती आलेले दर रु. 225/MT (त्यावर 4.5% वार्षिक चक्रवाढ) COD नंतरला मंजूरी
5. प्रारुप करारनामा व या प्रकल्पाकरीता करण्यात आलेली संपूर्ण प्रक्रियेसह मंजूरी

उपरोक्त, वरील सर्व बाबींचा विचार करता, वरील प्रस्तावास मा. स्थायी समितीने मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मा. सदस्य श्री. राजु भा. नागुलवार यांचा विरोध नोंदवून प्रस्तावित विषयास समितीने बहुमताने मंजूरी प्रदान करुन महासभेच्या मंजूरीस्तव पाठविण्यात यावा यास समितीने बहुमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 870</u>:— Providing Maintenance & Support for Operation of Nagpur {नगरयंत्री (ई— गव्हर्नन्स)} Municipal Corporation eGovernance ERP System या कामासाठी निविदा मागविल्या असता एकुण ३ निविदा प्राप्त झाल्यात. त्यांचे Quality Cost Based Selection (QCBS) या पध्दतीने तांत्रिक व वित्तिय मुल्यमापन केले असता M/s. Mars Telecom System Pvt. Ltd., Mumbai यांची प्रथम वर्षाकरीताची रू. 1,56,25,778.33 रकमेची पृष्ठ क्र. १९ वरील Clause No. 5.14 नुसार गुणानुक्रमे प्रथम क्रमांकाची निविदा ठरते. ही निविदा ३ वर्षाच्या कालावधीकरीता मागविण्यात आलेली असून दुसऱ्या वर्षी ५ टक्के जास्त दराने भुगतान करण्यात येईल व तिसऱ्या वर्षी १० टक्के जास्त दराने भुगतान करण्यात येईल असे निविदा अटी व शर्ती मधे पृष्ठ क्र. 34 **Annexure 3 Financial Bid Format** वर नमूद आहे. त्यामुळे M/s. Mars Telecom System Pvt. Ltd., Mumbai यांची दुसऱ्या वर्षाकरीता निविदा राशी रू. 1,64,07,067.25 व तिसऱ्या वर्षाकरीता रू. 1,71,88,356.17 एवढी होईल. त्यामुळे तीन वर्षाकरीतांची एकुण निविदा राशी रू. (रू.1,56,25,778.33 + रू. 1,64,07,067.25 + रू. 1,71,88,356.17) = रू. 4,92,21,201.75 say रू. 4,92,21,202/—एवढी होईल.

सबब M/s. Mars Telecom System Pvt. Ltd., Mumbai यांची ३ वर्षाकरीताची एकुण रू. 4,92,21,202/— रकमेची गुणानुक्रमे प्रथम क्रमांकाची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन Technical Score बरोबर देण्यांत आले नाही अशी तक्रार प्राप्त झाल्यामुळे, "मुख्य अभियंता" यांनी स्पष्ट अभिप्राया सहित प्रस्तावित विषय दोन दिवसांत स्थायी समितीच्या सभेपूढे ठेवावा यासह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 871**:— {लोककर्म झोन 06} प्रभाग क्र. 41 अ महाल येथे जिल्हा परिषद शाळेजवळ, मेखानी श्री. नागपूरकर व हिरडे यांच्या घराजवळ ठिक ठिकाणी सिमेंट रोडचे बांधकामास्तव प्राप्त 3 निविदांपैकी मे. अमित मोहन कर्णे यांची प्राकलनीय दरापेक्षा 14.66 टक्के प्रतिशतने कमी दराची रु. 25,60,077/— रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 872**:— छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकिय भवन, सिव्हील लाईन्स, **{नविन प्र. भवन प्रकल्प}** महानगरपालिका नागपूर येथिल सातव्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहाचे तसेच सहाव्या—सातव्या मजल्यावरील टाऊन हॉलचे कामासाठी एकुण 5.50 कोटीचे वळती करण्यात आलेल्या प्रावधानातुन स्थायी समिती सभागृह/टाऊन हॉलचे कामाऐवजी खालील कामांच्या बदलांना स्थायी समितीच्या निदर्शनास आणुन देणेबाबत.

रूपये 5.50 कोटीचे प्रावधान वळती करण्याचे प्रस्तावाला सर्व साधारण सभा ठराव क्र. 345 दिनांक 6/10/2016 रोजी मान्यता प्रदान करण्यात आली आहे. यामध्ये ऑडोटोरीयम ( टाऊन हॉल) व स्थायी समिती हॉल या कामाचा समावेश होता. परंतु ही कामे करण्याऐवजी वरचे मजले (सहावा मजला "A" विंग व सातवा मजला पुर्ण) हे स्मार्ट सीटी कार्यालयाकरीता देण्याकरीता मा. आयुक्तांनी याआधी मंजुरी प्रदान केलेली आहे. सबब आता नविन प्रशासकिय इमारतीचे ऑडोटोरीयम
(टाऊन हॉल) व स्थायी समिती हॉल चा खर्च करावा लागणार नाही. त्या ऐवजी पुढील कामे करण्याचे प्रस्तावित आहे.

1. सध्या फायर ब्रिगेड स्टेशन कार्यालयाकडुन जाणाऱ्या पोच मार्गाचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे/पावसाळी नालीचे बांधकाम करणे/नाल्याचे बांधकाम करणे. (सध्या फायर ब्रिगेड स्टेशनचे नविन प्रशासकिय इमारतीचे "ए" विंगला फायर ब्रिगेड चे कार्यालयातील कर्मचाऱ्यांना धुळीचा त्रास होत असल्यामुळे तसेच फायर ब्रिगेडच्या गाडयासाठी हा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करण्याची सततची मागणी आहे. (HOD बैठकीतही हा विषय आला होता.) सबब हा सिमेंट कॉंक्रीटीचा रस्ता होणे आवश्यक आहे. सिमेंट कॉंक्रीट कामाचे सर्व्हे करणे, जिओटेक्निकल तपासणी करणे, रस्ता व नाल्याचे डिझाईन करणे व डिपीआर तयार करणे ही कामे आर्किटेक्ट श्री खरे यांचे ऐवजी, सिमेंट रस्ते फेज— 3 चे एजन्सी Infraking consulting engineer private Ltd. व इतर मंजुर एजन्सिकडुन मंजुर दरावर करण्यात येईल.)
2. रेकॉर्ड ठेवण्याकरीता Compactors ची व्यवस्था करणे.
3. मॉडयुलर फर्नीचर जसे टेबल, आलमारी, खुर्च्या, वर्कस्टेशन इत्यादीची व्यवस्था करणे.
4. इमारतीची उर्वरीत कामे तसेच उर्वरीत डांबरीकरणाची कामे करणे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सभापती :— मा.सदस्यांच्या वार्ड फंड, फिक्स प्रायरिटी, व झोनल बजेटच्या निधीच्या संदर्भात प्रमुख लेखा व वित्त अधिकारी यांनी 60 टक्के कपातीचे जे आदेश काढले आहे त्यासंदर्भात मागच्या स्थायी समितीच्या चार—पाच सभेत कार्यालयाला परिपत्रक रद्द

करण्यासंदर्भात वारंवार निर्देशित करण्यात आले होते यानंतरही दोन–तीन झोन वगळता इतर झोनच्या सहा.आयुक्तांकडुन मा.सदस्यांच्या वार्ड फंड,फिक्स प्रायरिटी व झोनल बजेटच्या नस्त्या थांबविण्यात येत आहे त्यामुळे वार्ड विकासाच्या कामावर परिणाम होत आहे यामुळे 60 टक्के कपातीचा निर्णय त्वरीत रद्द करण्याच्या दृष्टीने स्थायी समितीच्या मा.सदस्यांसोबत मा. आयुक्तांशी चर्चा करुन या विषयावर त्वरीत निर्णय करुन घेण्यात येईल.

ठराव क्रमांक 873 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर